(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – III ISSN 2277-8063

# संयुक्त राष्ट्राच्या सशक्तीकरणासंबंधी पंडित नेहरूंची भुमिका

**डॉ. संजय गोरे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शरदराव पवार महाविद्यालय, गडचांदुर, जि. चंद्रपुर ४४२९०८**
**मोबाईल क्र. ९२२६११६५४०** Email: sanjaygore.1462@rediffmail.com

---

**सारांश:** जागतिक शांतता व सुरक्षेसाठी कटिबध्द असणारा देश, युनोच्या सशक्तीकरणाकरीता व लोकशाहीकरणाकरीता पाठपुरावा करणारा देश, निशस्त्रीकरणाचा समर्थक देश व शांती मोहिमांत सक्रिय सहभागी होणारा देश अशा विविध दृष्टीने भारताने संयुक्त राष्ट्रांत आपला वेगळा ठसा उमटविण्यात यश प्राप्त केले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शांतताविषयक कार्याचे समर्थन करताना पंडित नेहरू म्हणतात की, “शांतता हा एक गुण आहे. तो जीवनमार्ग आहे. ती एक पध्दत आहे आणि ते आपले ध्येय आहे.

कोणतेही एक राज्य परस्पर सहकार्याशिवाय आणि योजनाबध्द एकसुत्रीकरणाशिवाय सामाजिक—आर्थिक प्रश्न सोडवू शकत नाही. असे प्रश्न सोडविण्याच्या गरजेतून अनेक देश एकत्र येण्याचा प्रयत्न करतात. आणि त्यातूनच आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण झाल्याच्या दिसून येतात. दुसऱ्या महायुध्दानंतर संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली असली तरी अशाप्रकारच्या संघटना या प्राचिन आणि मध्ययुगीन कालखंडात वेगवेगळया स्वरूपाची राज्ये विभिन्न उद्दिष्टांसाठी एकत्र येण्याच्या प्रयत्नातून स्थापन करण्यात आल्या आहेत. जागतीक शांतता आणि सुव्यवस्था रक्षण व संवर्धनात आणि बड्या राष्ट्रांच्या युध्दपिपासू, आक्रमक आणि महत्वाकांक्षी भूमिकेला पायबंद घालण्यात राष्ट्रसंघ अयशस्वी ठरली. परिणामी पहिल्या पहायुध्दापेक्षा विध्वंसक दुसरे महायुध्द ठरले. असे असले तरी राष्ट्रसंघाचे आर्थिक, सामाजिक व मानवी कार्यातील योगदान महत्वपूर्ण मानले जाते. “परिणामी तिसऱ्या महायुध्दाच्या धोक्यापासून जगाला वाचविण्यासाठी सर्व राष्ट्रांच्या सामुहिक प्रयत्नाची आवश्यकता असल्याची जाणीव आंतरराष्ट्रीय समुदयाला झाली. या जाणीवेची फलश्रुती म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना होय”युनोच्या स्थापनेपासून स्वतंत्र भारताच्या वाटचालीत पंडित नेहरू आणि नंतरच्या काळात संयुक्त राष्ट्र आणि भारत यांच्यातील संबंध हे सहकार्याचे, विश्वासाचे आणि आदराचे राहिले आहे. कारण युनोच्या उद्दिष्टांशी, तत्वांशी आणि मुल्यांशी असलेली भारताची बांधीलकी होय. ही बांधीलकी पंडित नेहरू आणि त्यानंतरच्या काळात भारताने वेळोवेळी आपल्या कृतीतून सिध्द केले.

नेहरूंच्या मते, “भारत स्वत:चे स्वतंत्र धोरण ठरविण्यासोबतच आंतरराष्ट्रीय संबंधात सक्रिय सहभाग घेईल. सर्व शांतताप्रिय राष्ट्रांबरोबर भारताचे संबंध हे मैत्रीपूर्ण व सहकार्याचे असतील. भारत आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी इतर राष्ट्रांशी सहकार्य करेल. शातयुध्दाच्या राजकारणापासून अलिप्त आणि जागतिक एकतेसाठी प्रयत्नशिल राहील. भौगोलिक व सांस्कृतिकदृष्ट्या जवळ असलेल्या आशियाई देशांशी अधिक जवळीक निर्माण करील” एकंदरीत पंडित नेहरूंनी जागतिक शांतता, सुरक्षा टिकविण्यासाठी संयुक्त राष्ट्रांशी सहकार्य करण्याची घोषणा केली. तसेच गटा—तटापासून अलिप्त राहून स्वतंत्र विदेशनिती आखण्याचेही सुचित केले.

**संयुक्त राष्ट्राची उद्दिष्ट्ये व पं. नेहरू :** संयुक्त राष्ट्रांच्या प्रस्तावनेत स्विकारलेली उद्दिष्ट्ये आणि तत्वे यांचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेत पडले आहे. १३ डिसेंबर १९४६ साली पंडित नेहरूंनी भारतीय घटनेच्या उद्देशाचा प्रस्ताव मांडला. या उद्देश प्रस्तावाचे जनकत्व पंडित नेहरूंकडे जाते. युनोच्या सनदेची सुरूवात “आम्ही संयुक्त राष्ट्राचे लोक” या वाक्याने तर भारतीय घटनेच्या उद्देशपत्राची सुरूवात ‘आम्ही भारतीय लोक‘ अशा सारगर्भीत व अर्थपूर्ण वाक्याने प्रारंभ होतो. युनोप्रमाणे भारतानेही जागतिक शांतता व सुरक्षाप्रती बांधिलकी स्विकारली आहे. राज्यघटनेच्या चौथ्या भागात मार्गदर्शक तत्वांत सामाजिक, राजकीय, आर्थिक व आंतरराष्ट्रीय अशा तत्वांचा समावेश केला आहे. या मार्गदर्शक तत्वांवर पंडित नेहरू, डॉ. आंबेडकर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव पडला आहे.

एकंदरीत भारतीय घटनेतील मार्गदर्शक तत्वे म्हणजे युनोच्या मानवतावादी कार्याशी बांधीलकी सांगणारे तत्वे आहेत. स्त्री पुरूष समानता, सत्ता विकेंद्रीकरण, कल्याणकारी योजना, आर्थिकदुष्ट्या दुर्बलांना दिलेल्या विशेष सवलती व अल्पसंख्यांकाचे संरक्षण यासारख्या तरतूदींचा समावेश भारतीय संविधानात केला आहे. या तरतूदीतून भारताने संयुक्त राष्ट्रांशी आपली कटीबध्दता सुत्रबध्द केली आहे. थोडक्यात भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेवर व मार्गदर्शक तत्वांवर संयुक्त राष्ट्राची सनद व पंडित नेहरू यांचा प्रभाव पडल्याचे स्पष्ट होते.पंचशिल हा भारतीय परराष्ट्र धोरणाचा पाया आहे. विविध विचारप्रणालीवर आधारीत असणाऱ्या देशात शांततापूर्ण सहअस्तित्वाचा पुरस्कार करणे, हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे एक महत्वपूर्ण उद्दिष्ट आहे. विशेषत: जगाने दोन महायुध्द अनुभवले होते. दुसऱ्या महायुध्दात आण्विक अस्त्रांचा वापर केला होता. जगासमोर तिसऱ्या जागतिक आण्विक युध्दाची भिती होती. अशा पार्श्वभूमिवर पंडित नेहरूंनी मांडलेले पंचशिल तत्वे निश्चितच उल्लेखनिय ठरतात.

एकंदरीत या पंचशिल धोरणाद्वारे भारताची जागतिक राजकारणातील आणि संयुक्त राष्ट्रांच्या शांतता, सुरक्षितता व सहकार्य या क्षेत्रातील भूमिका स्पष्ट होते. पंचशिल धोरणाद्वारे पंडित नेहरूंनी व

भारताने संयुक्त राष्ट्रांशी सहकार्याची भूमिका चोखपणे बजावली असे म्हणता येईल.वसाहतीकरणाचा अंत करणे हे संयुक्त राष्ट्रांचे एक मुलभूतत उद्‌दिष्ट आहे. भारताने सुरूवातीपासूनच निर्वसाहतीकरणाच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. आशिया आणि आफ्रिकेतील विविध देशांतील वसाहतवादाचा नायनाट करण्यासाठी भारताने अथक प्रयत्न केले. वसाहतवादाच्या विरोधांबाबत नेहरूंनी असे मत मांडले की, “वसाहतवादाचा अंत विश्व शांतीसाठी आणि विकासासाठी आवश्यक आहे. इ.स.१९५० दशकाच्या प्रारंभी अनेक नवस्वतंत्र देशांना संयुक्त राष्ट्रात सदस्यत्व मिळवून देण्यावर भारताने लक्ष केंद्रीत केले. या देशांना संयुक्त राष्ट्राच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय समाजातील सार्वभौम राष्ट्रांची मान्यता प्राप्त होत असल्यामूळे ते राष्ट्र सदस्यत्वासाठी प्रयत्नशिल असतात. एकंदरीत संयुक्त राष्ट्रांत नवस्वतंत्र राष्ट्रांना सदस्य प्राप्तीसाठी भारताने व पंडित नेहरूंनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. यासाठी आशिया आफ्रिकेतील विकसनशिल राष्ट्राचे नेतृत्व केले. भारताने हे प्रयत्न करतांना बड्या राष्ट्रांच्या धोरणावर टिकाही केली.

भारताने वंशवादाचा सातत्याने विरोध केला आहे. कारण वंशवादावरच वसाहतवाद आधारीत आहे. एकंदरीत भारताच्या प्रयत्नामुळे ०६ नोव्हेंबर १९६२ रोजी महासभेने वंशवादी देशाविरूध्द राजकीय संबंध संपुष्टात आणण्यासाठी व विविध उपाययोजना करण्यासाठी एक प्रस्ताव पास केला. एकंदरीत स्वातंत्र्यपूर्वीपासूनच पं. नेहरू व भारताने वंशवादाचा विरोध केला आहे. त्यामुळे वंशवादाचा विरोध हे तत्व भारतीय परराष्ट्र धोरणाचे एक प्रमुख वैशिष्ट्ये बनले आहे.विश्वशांतीसाठी निःशस्त्रीकरणाची आवश्यकता आहे. त्यामूळे संयुक्त राष्ट्रांचे हे एक महत्वपूर्ण उद्‌दिष्ट आहे. भारतानेही युनोच्या निःशस्त्रीकरण व शस्त्रनियंत्रणाच्या प्रयत्नात सकारात्मक आणि प्रभावी भूमिका बजावली आहे. भारताची निःशस्त्रीकरणाप्रती अशी भूमिका होती की, सर्व बड्या राष्ट्रांनी आपापल्या लष्करावरील किंवा शस्त्रीकरणावरील खर्च कमी करावा आणि त्यातून वाचलेला पैसा हा विकासावर खर्च करावा, शिल्लक पैसा आर्थिक प्रगतीसाठी खास निधीत जमा करावा, तो जमा झालेला पैसा आर्थिकदृष्ट्या मागास राष्ट्रांना विकासासाठी द्यावा. भारताने संयुक्त राष्ट्रांद्वारे संचालित सर्व शांतता स्थापनेच्या कार्याचे समर्थन केले आहे. आणि आवश्यकतेनूसार पूर्ण सहकार्य केले आहे. प्रारंभापासूनच भारताने युनोची शांततेच्या कार्यात क्षमता मजबूतीची घेतली आहे.

**सारांश :**

भारताला प्राचीन अशी गौरवशाली ऐतिहासीक परंपरा लाभली आहे. त्यामूळे भारत सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न देश म्हटला जातो. या ऐतिहासीक परंपरेतून भारतीय जीवनपध्दतीचे मुल्य विकसीत झाले आहे. १९४५ साली विश्वशांततेकरीता स्थापित संयुक्त राष्ट्रांचे सातत्याने समर्थन केले. पंडित नेहरूंच्याच शब्दांत, “सुरूवातीपासून भारताने राष्ट्रसंघाशिवाय आधुनिक जगाची कल्पनाच करू शकत नाही.” सुरूवातीपासूनच भारताने या संघटनेच्या विविध संस्थेमध्ये प्रभावी असे योगदान दिले आहे.

भारताने संयुक्त राष्ट्रांना जागतिक सरकारच्या स्थापनेकडे नेणाऱ्या मार्गावरील एक महत्वाचा टप्पा मानला आहे. जगात चिरस्थायी शांतता नांदवायची असेल तर सर्व राष्ट्रांवर नियंत्रण ठेवणारी जागतिक संघटना असावी अशी भूमिका घेतली आहे. यासंदर्भात पंडित नेहरू म्हणतात की, “अनादी काळापासून चालत आलेली मानवतेच्या शांततेची आस म्हणजे युनो. युनो मोडून टाकणे ही जगाच्या दृष्टीने फार मोठी शोकांतीका ठरेल. जगाच्या सरकारकडे आपणाला वाटचाल करावयाची आहे. युनो हा त्यामार्गावरील एक महत्वाचा टप्पा आहे.” राष्ट्र विकास व जनकल्याणाचे उद्‌दिष्ट साधण्यासाठी देशांतर्गत राजकीय स्थैर्य व शांततेबरोबरच शेजारील देशांसोबत शांततावादी, परस्पर सहाकार्याचे व मैत्रीचे संबंध असणे आवश्यक ठरते. म्हणूनच भारताने परराष्ट्र धोरणाची आखणी करतांना आपल्या शेजारील राष्ट्रांशी अत्यंत जिव्हाळयाचे संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ सुचीः**

१ **जान्सन बोर्जेस** : संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०११
२ **सुरेश काकडे व सुनिल दाते**: आंतरराष्ट्रीय राजकारणाचा इतिहास (१९१९ ते १९५३) विद्‌या प्रकाशन, नागपूर
३ **शैलेंद्र देवळाणकर** : संयुक्त राष्ट्रे, प्रतिमा प्रकाशन, पुणे २००८
४ **दिनानाथ वर्मा** : अंतर्राष्ट्रीय सम्बन्ध, ज्ञानदा प्रकाशन,नई दिल्ली, २०१०
५ **कुलदिप फडिया**:संयुक्त राष्ट्रसंघ एव् अन्य प्रमुख अन्तर्राष्ट्रीय संगठन, प्रतियोगीता साहित्य सीरीज, आगरा, २०११
६ **सुखबीर सिंह,**:भारतीय विदेशनीति : उद्‌भव और विकास भाग १ (१८८५–१९४७) युनिवर्सिटी पब्लिकेशन, नई दिल्ली, १९९९
७ **पुखराज जैन एव् बी. एल. फडिया :** भारतीय शासन एव् राजनिति (राज्यों की राजनीति सहित), साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा, २००८
८ **तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर** : भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया,द युनिक अकॅडमी, पूणे, २०११
९ **भीमराव रामजी आंबेडकर** : भारताचे संविधान, भारत सरकार विधी,न्याय व कंपनी कार्य मंत्रालय, महाराष्ट्र सरकार, मुंबई, २०१२
१० **व्हि.एन. खन्ना एव् लिपाक्षी अरोडा** : भारत की विदेशनीति, विकास पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २०१०
११ **बी. एल. फडिया** : अन्तर्राष्ट्रीय राजनीति : सिध्दांत एवं समकालीन राजनीतिक मुद्‌दे, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा, २०१०